जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत राबवावयाच्या योजनांबाबत (सर्वसाधारण योजना)
पशुसंवर्धनासाठी प्रदर्शन व प्रचार कार्यक्रम

**महाराष्ट्र शासन**
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः जिवायो/२०१०/प्र.क्र.२९२/१०/पदुम-४
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक : ३० ऑगस्ट, २०१०

वाचा: १. शासन नियोजन विभागाचे पत्र क्रमांक जिवायो-१००९/प्र.क्र.२१३/का.१४८१
मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक ३० डिसेंबर, २००९.

**शासन निर्णयः**

जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत **पशुसंवर्धनासाठी प्रदर्शन व प्रचार कार्यक्रम** ही योजना सन २०१०-११ पासून राज्यात राबविण्यास याव्दारे शासनाची प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

१. पशुप्रदर्शनाद्वारे ग्रामीण भागातील पशुपालकांना/शेतकऱ्यांना पशुसंवर्धनाविषयी सर्वांगीण माहिती मिळावी व त्यायोगे त्यांना पशुसंवर्धनाबाबत आवड निर्माण होऊन शाश्वत उत्पन्नाचे साधन म्हणून पशुपालनाकडे बघण्याची दृष्टी प्राप्त करुन देणे व शास्त्रोक्त पशुपालनाचा प्रसार करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

२. सदर उपयोजनेअंतर्गत खालील बाबींवर पशुप्रदर्शनासाठी खर्च करण्यात यावा.
(२.१) प्रदर्शनात सहभागी व विजयी घोषित करण्यात आलेल्या पशुपक्ष्यांना बक्षिस वाटप
(२.२) पशुपक्ष्यांना देण्यात येणारा चारा व पशुखाद्य
(२.३) प्रदर्शन व प्रचारांकरीता साहित्य तयार करणे.
(२.४) प्रदर्शन स्थळी स्टॉल लावणे.
(२.५) पशुप्रदर्शनावरील अनुषंगीक खर्च
(२.६) वासरांचा मेळावा/जंतनिर्मुलन/औषधोपचार/लसीकरण इ. वरील अनुषंगीक खर्च
(२.७) विस्तार कार्य

३. पशुप्रदर्शनात सहभागी होणाऱ्या विविध जातीच्या प्रत्येक गटामध्ये किमान १० स्पर्धक पशु/पक्षी यांचा सहभाग अनिवार्य राहील. १० पेक्षा कमी सहभाग असणाऱ्या गटासाठी प्रथम, द्वितीय व तृतीय बक्षिसे न देता उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात यावीत व या बाबींवर निवड समितीचा निर्णय अंतीम राहील.

४. दुग्धस्पर्धातील जनावरांच्या बाबतीत गटातील १० जनावरांची अट अपवादात्मक परिस्थितीत शिथीलक्षम राहील.

५. प्रदर्शनस्थळी भेट देणाऱ्या व्यक्तींना सहभागी जनावरांची गुणवैशिष्टे वर्णन करण्यासाठी तांत्रिक अधिकारी / कर्मचारी यांची नियुक्ती करावी.

६. जनावर निवडीमध्ये वाद उद्भवल्यास पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या तज्ञाचा तांत्रिक सल्ला घेवून बक्षिस पात्र जनावरांच्या निवडीबाबतचा अंतिम निर्णय प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांनी घ्यावा.

७. सहभागी जनावरांना आवश्यक ती पशुवैद्यकिय सेवा पुरविण्यात यावी.

८. यात्रेनिमित्त भरविण्यात येणाऱ्या पशुप्रदर्शनासाठी दृकश्राव्य माध्यमाव्दारे आवश्यक ती प्रसिध्दी द्यावी.

९. पशुप्रदर्शनात सहभागी जनावरांची निवड करुन विजयी घोषित करण्यासाठी आवश्यक त्या तांत्रिक अधिकाऱ्यांच्या निवड समितीचे गठण संबंधित विभागाच्या प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांनी

करावे.

१०. पशुप्रदर्शनावर होणाऱ्या विविध बाबींवरील खर्चास मंजूरीचे अधिकार तसेच तांत्रिक मंजूरीचे अधिकार खालील समितीस राहतील.

| | | |
|---|---|---|
| १. | मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. | - अध्यक्ष |
| २. | अति. मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. | - सदस्य |
| ३. | मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि. प. | - सदस्य |
| ४. | जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, | - सदस्य |
| ५. | उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. (पंचायत) | - सदस्य |
| ६. | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जि. प. | - सदस्य सचिव |

११. पशुसंवर्धन विषयक योजनांच्या विस्तार कार्यासाठी निधीचा विनियोग करण्यात यावा.

१२. जिल्हा योजनेअंतर्गत सदर उपयोजनेसाठी २४०३ पशुसंवर्धन या लेखाशिर्षा अंतर्गत ३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या बाबीकरीता जिल्हा नियोजन समितीकडे निधी आरक्षित करावा.

१३. नियोजन विभाग शासन निर्णय क्र.जिवायो-१००७/प्र.क्र.३९/का-१४४४, दि. १६/२/२००८ नुसार जिल्हा परिषदेची प्रशासकीय मंजूरी घेण्यात यावी.

१४. सदर योजनेचे कार्यान्वयीन अधिकारी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, संबंधित जिल्हा परिषद हे राहतील. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी सदरच्या पशुप्रदर्शनाच्या आयोजनाबाबतचा अंतिम अहवाल प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांचेमार्फत आयुक्त पशुसंवर्धन यांना सादर करावा. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त हे या उपयोजनेचे विभागीय सनियंत्रण अधिकारी राहतील तर संपूर्ण राज्याकरिता अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन हे सनियंत्रण अधिकारी राहतील.

हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२०२१/१४३१ दि.१३.८.२०१० व वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.४९९/१०/व्यय-२ दि. २४.८.२०१० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेताक २०१००८३११२३२२३९००१ आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नावाने,**

**(डॉ. मा.ना. सवाईसोनकांबळे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत -

मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय) यांचे खाजगी सचिव
आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती)
सर्व जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
महालेखापाल-१/२, मुंबई/नागपूर
प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त (सर्व)
जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त (सर्व)
जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (सर्व)
जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
नियोजन विभाग (कार्यासन-१४३१), मंत्रालय,मुंबई
वित्त विभाग (व्यय-२),मंत्रालय,मुंबई
अवर सचिव पदुम-३/१६, कक्ष अधिकारी पदुम-१/१अ, कृषि व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई
निवड नस्ती

आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे ०१ यांचे कार्यालय

४३३८-४४१२

क्रमांकः विस्तार /प्र.प.-मासू / ४३३८-४४१२ /२०११ पसं १३, पुणे-१ दिनांक १८/०७/२०११

**विषय- जिल्हा वार्षिक योजना सन २०११-१२ अंतर्गत राबवावयाच्या योजना (सर्वसाधारण योजना) -- पशुसंवर्धनासाठी प्रदर्शन व प्रचार कार्यक्रम योजनाबाबत मार्गदर्शक सूचना.**

**संदर्भः-** महाराष्ट्र शासन क्रमांक- जिवायो -२०१० /प्र.क्र.-३४०/पदुम-४ मंत्रालय,विस्तार मुबई -३२ , दि. ३०/०८/२०१०.

## मार्गदर्शक सूचना.

## योजनेचा उद्देश -.

पशुप्रदर्शनाद्वारे ग्रामीण भागातील पशुपालकांना/शेतकऱ्यांना पशुसंवर्धनाविषयी सर्वांगीण माहिती मिळावी व त्यायोगे त्यांना पशुसंवर्धनाबाबत आवड निर्माण होऊन शाश्वत उत्पन्नाचे साधन म्हणून पशुपालनाकडे बघण्याची दृष्टी प्राप्त करुन देणे व शास्त्रोक्त पशुपालनाचा प्रसार करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

**योजनेचे स्वरूप –**

१. सदर उपयोजनेअंतर्गत आयोजीत पशुप्रदर्शनासाठी खालील बार्बीवर खर्च करण्यात यावा.

अ.प्रदर्शनात सहभागी व विजयी घोषित करण्यात आलेल्या पशुपक्ष्यांना बक्षिस वाटप
ब.पशुपक्ष्यांना देण्यात येणारा चारा व पशुखाद्य
क.प्रदर्शन व प्रचाराकरीता साहित्य तयार करणे.
ड.प्रदर्शन स्थळी स्टॉल लावणे.
ई.पशुप्रदर्शनावरील अनुषंगीक खर्च
प.वासरांचा मेळावा/जंतनिर्मुलन/औषधोपचार/लसीकरण इ. वरील अनुषंगीक खर्च.
फ.विस्तार कार्य.

२. पशुप्रदर्शनात सहभागी होणाऱ्या विविध जातीच्या प्रत्येक गटामध्ये किमान १० स्पर्धक पशु/पक्षी यांचा सहभाग अनिवार्य राहील. १० पेक्षा कमी सहभाग असणाऱ्या गटासाठी प्रथम, द्वितीय व तृतीय बक्षिसे न देता उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात यावीत व या बार्बीवर निवड समितीचा निर्णय अंतीम राहील.

३. दुग्धस्पर्धातील जनावरांच्या बाबतीत गटातील १० जनावरांची अट अपवादात्मक परिस्थितीत शिथीलक्षम राहील.

४. प्रदर्शनस्थळी भेट देणाऱ्या व्यक्तींना सहभागी जनावरांची गुणवैशिष्टे वर्णन करण्यासाठी तांत्रिक अधिकारी / कर्मचारी यांची नियुक्ती करावी.

५. बक्षिस पात्र जनावर निवडीमध्ये वाद उद्भवल्यास पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या तज्ञाचा तांत्रिक सल्ला घेवून बक्षिस पात्र जनावरांच्या निवडीबाबतचा अंतिम निर्णय प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांनी घ्यावा.

६. सहभागी जनावरांना आवश्यक ती पशुवैद्यकिय सेवा पुरविण्याची सोय प्रदर्शन स्थळी उपलब्ध करून देण्यात यावी.



कृ.मा.प.

७. यात्रेनिमित्त भरविण्यात येणाऱ्या पशुप्रदर्शनासाठी दृक श्राव्य माध्यमाव्दारे आवश्यक ती प्रसिध्दी देण्यात यावी.

८. पशुप्रदर्शनात सहभागी जनावरांची निवड करुन विजयी जनावरे घोषित करण्यासाठी आवश्यक त्या तांत्रिक अधिकाऱ्यांच्या निवड समितीचे गठण संबंधित विभागाच्या प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांनी करावे.

९. पशुप्रदर्शनावर होणाऱ्या विविध बाबींवरील खर्चास मंजूरीचे अधिकार तसेच तांत्रिक मंजूरीचे अधिकार खालील समितीस राहतील.

| | |
|---|---|
| १. मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. - | अध्यक्ष |
| २. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. - | सदस्य |
| ३. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि. प. - | सदस्य |
| ४. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, - | सदस्य |
| ५. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.(पंचायत) - | सदस्य |
| ६. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जि. प. - | सदस्य सचिव |

१०. पशुसंवर्धन विषयक योजनांच्या विस्तार कार्यासाठी निधीचा विनियोग करण्यात यावा.

११. जिल्हा योजनेअंतर्गत सदर उपयोजनेसाठी २४०३ पशुसंवर्धन या लेखाशिर्षा अंतर्गत ३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या बाबीकरीता जिल्हा नियोजन समितीकडे निधी आरक्षित करावा.

१३. नियोजन विभाग शासन निर्णय क्र.जिवायो-१००७/प्र.क्र.३९/का-१४४४, दि. १६/२/२००८ नुसार जिल्हा परिषदेची प्रशासकीय मंजूरी घेण्यात यावी.

१४.सदर योजनेचे कार्यान्वयीन अधिकारी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, संबंधित जिल्हा परिषद हे राहतील. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी सदरच्या पशुप्रदर्शनाच्या आयोजनाबाबतचा अंतिम अहवाल प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांचेमार्फत आयुक्त पशुसंवर्धन यांना सादर करावा. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त हे या उपयोजनेचे विभागीय सनियंत्रण अधिकारी राहतील तर संपूर्ण राज्याकरिता अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन हे सनियंत्रण अधिकारी राहतील.

१५. प्रदर्शन पूर्ण झाल्यानंतर सविस्तर अहवाल खात्यास सादर करावा.

अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन
आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
यांचे कार्यालय

| | |
|---|---|
| प्रत:- १. | मा. सचिव, महाराष्ट्र शासन, कृषि पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर. |
| (२ ते ८) | मा. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, विभाग सर्व माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी |
| (९ ते ३८ ) | जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, सर्व माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी |
| (३९ ते ७२) | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी |
| (७३) | कार्यासन अधिकारी पसं ६ यांना माहितीसाठी. |